## (आरोपी जिल्हा मध्यवर्ती कारागृह, परभणी येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर)

सरतपासणी सरकारपक्षातर्फे **साक्षीदार क्र.०५**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | **भगवान मसाजी वाघ,** |
| वय | – | ३५ वर्षे, |
| व्यवसाय | – | नौकरी, |
| राहणार | – | सेलू, जि. परभणी. |

**<u>सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. डी.यु. दराडे, सरकारी वकील</u>**

०१) मी सहायक कृषी अधिकारी या पदावर सेलू येथे सन २०२० पासून कार्यरत आहे. मी क्षेत्रीय अधिकारी म्हणून काम करतो. दिनांक ०२.०५.२०२४ रोजी मी सेलू येथे होतो. त्यादिवशी, मी माझे कामानिमित्त शेती सर्वेक्षणाला गेलो होतो. मला माझे वरिष्ठ अधिकारी श्री.पठाण साहेब यांचा फोन आला की मला पंच म्हणून सेलू पोलीस स्टेशन येथे जायचे आहे. त्याप्रमाणे त्यांनी पत्र मला व्हॉट्सअॅपवर पाठविले. त्याप्रमाणे मी सेलू पोलीस स्टेशन येथे गेलो. मला आता संदर्भाप्रमाणे दिनांक ०२.०५.२०२४ रोजीचे पत्र दाखविले. त्यावर श्री.पठाण साहेबांची सही आहे. ते पत्र माझे सहकारी श्री.मुसळे यांना सुध्दा दिले होते. सदरहू पत्रास **नि.क्र.५५/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला. आम्ही दोघेही पोलीस स्टेशनला सोबत गेलो. पोलीस स्टेशनमध्ये आरोपीला बोलविले होते. पोलीसांनी विचारणा केल्यानंतर आरोपीने सांगितले की त्याने चाकू ठेवलेला आहे, तो काढून देतो. पोलीसांनी त्याचे लिखाण करून आमच्या सह्या घेतल्या होत्या. मला आता दिनांक

०२.०५.२०२४ रोजीचा पंचनामा दाखविला. त्यावर क्र.०१ वर माझी व क्र.०२ वर मुसळे यांची सही आहे. त्यावर आरोपी व पोलीसांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. निवेदन पंचनामास **नि.क्र.५६/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला.

०२) त्यानंतर, आम्ही दोन्ही पंच, आरोपी व पोलीस हे शासकीय वाहनाने आरोपीने सांगितल्याप्रमाणे मोरेगाव, ता. सेलू, जि. परभणी येथे गेलो. गावामध्ये आरोपीने त्याचे घर दाखविले व गाडी थांबविण्यास सांगितली. आरोपीने त्याच्या घरातील एका जुन्या डब्यातून लोखंडी सारखा काळया रंगाचा यामधून चाकू काढून दिला. चाकू हा अंदाजे १ ते १.२५ फुट लांबीचा होता. पोलीसांनी जप्ती पंचनामा तयार केला. चाकूचे मोजमाप केले. चाकू पॅक करून पॅकेटमध्ये टाकला. मला आता तो पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सुध्दा सही आहे. आरोपीची सही आहे. जप्ती पंचनामास **नि.क्र.५७/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला.

०३) मला चाकू दाखविल्यास मी ओळखू शकतो. मला आता चाकू (एमओ–४) दाखविला, तो तोच आहे. त्याच्या कव्हरवर माझी सुध्दा सही आहे. ज्या व्यक्तीने चाकू काढून दिला, तो व्यक्ती आज रोजी दूरचित्रवाणीद्वारे न्यायालयात हजर आहे.

०४) कारवाईदरम्यान पोलीसांनी छायाचित्रे काढले होते. मला आता कारवाईदरम्यान काढलेले एकूण सहा छायाचित्रे दाखविले. त्या छायाचित्रांमध्ये मी, पोलीस, आरोपी, ई. लोकं दिसत आहेत. सदरहू छायाचित्रांना ओळखू म्हणून **नि.क्र.५८/१ ते नि.क्र.५८/६–पी.डब्ल्यू.०५**

देण्यात आला.

०५) आम्ही आरोपीच्या घरी असतांना आरोपीने सांगितले की तो कपडे काढून देतो. आरोपीने त्याच्या घरातून पॅन्ट, शर्ट व बनियान आणून दिले. शर्ट हा पांढऱ्या रंगाचा, पॅन्ट मळकट रंगाचा व हाफ बनियान असे होते. सदरहू कपडे मला दाखविले, सदरहू कपड्यांपैकी पॅन्ट व बनियानवर रक्ताचे डाग होते. पोलीसांनी कपडे जप्त केले. याबाबतचा पंचनामा तयार केला. तो पंचनामा मला दाखविला, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सुध्दा सही आहे. त्यास **नि.क्र.५९/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला. कपडे मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. कपडे जप्तीच्यावेळी पोलीसांनी छायाचित्रे काढले होते. मला आता ते दोन छायाचित्रे दाखविले, यामध्ये मी सुध्दा आहे. सदरहू छायाचित्रांना ओळख म्हणून **नि.क्र.६०/१ व नि.क्र.६०/२–पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला. मला आता कपडे दाखविले. मला आता पांढरा शर्ट दाखविला, तो माझेसमक्ष जप्त केला होता. त्यास **एमओ–०५** देण्यात आला. त्याच्या कपड्याच्या पाकीटावर सुध्दा माझी सही आहे. मला आता पॅन्ट दाखविला, तो माझेसमक्ष जप्त केला होता. त्यास **एमओ–०६** देण्यात आला. त्याच्या कपड्याच्या पाकीटावर सुध्दा माझी सही आहे. मला आता हाफ बनियान दाखविला, तो माझेसमक्ष जप्त केला होता. त्यास **एमओ–०७** देण्यात आला. त्याच्या कपड्याच्या पाकीटावर सुध्दा माझी सही आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. एम.ई. भोसले, वकील</u>**

०६) मला क्षेत्रीय काम म्हणून गिरगांव (खु.), गिरगांव (बु.) व अरसड असे गावे दिले होते. माझे कामाचे स्वरूप हे शासनाच्या योजनांची

अंमलबजावणी, शेतामध्ये प्रात्यक्षिक काम करणे, पिकांचे निरीक्षण करणे, ई. कामे आहेत. सदरहू गावे हे माझे कार्यालयापासून १८ ते २० किमी अंतरावर आहेत. आमचे सेलू येथील कार्यालय रेस्ट हाऊससमोर आहे. क्षेत्रीय कामाचे अधिकारी वगळता आमच्या कार्यालयामध्ये ८ ते १० लोकं काम करतात. त्यादिवशी कार्यालयातील इतर लोकं हे कार्यालयात होते किंवा नाही हे मला माहित नाही. मी कार्यालयीन पत्र (नि.क्र.५५) हे त्याच दिवशी रात्री प्राप्त केले. मला माझे कामाची नोंद ठेवावी लागते. मी त्यादिवशीच्या ठेवलेल्या नोंदी दाखल करू शकत नाही. कार्यालयीन पत्र (नि.क्र.५५) हे मला व्हॉट्सॲपद्वारे प्राप्त झाले होते हे मी आज पहिल्यांदा सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.५५ वर प्राप्त म्हणून माझी सही नाही म्हणून मी तशी साक्ष देत आहे. मला आता पत्र (नि.क्र.५५) दाखविले, त्यामध्ये तारखेच्या ठिकाणी महिना चौथा लिहिलेला आहे व वर्ष २०२४ लिहिलेले आहे व तारीख लिहिलेली नाही. मी संदर्भ पत्र जा.क्र.११५२/२०२३ दिनांक ०२.०५.२०२४ पोलीस स्टेशनहून प्राप्त झालेले पाहिले नाही.

०७) श्री.मुसळे यांच्याकडे कोणती गावे दिली होती हे मी सांगू शकत नाही. मी सेलू पोलीस स्टेशन येथे दुपारी ०२:०० वाजता पोहोचलो. आम्ही पोलीसांच्या कॅबिनमध्ये बसलेलो असतांना त्याठिकाणी आरोपीला आणले होते. आरोपी लॉकअपमध्ये होता काय हे मला माहित नाही. निवेदन पंचनामामधील मजकूर हा पोलीसांनी लिहिला होता त्याचे नाव मला माहित नाही. मोरेगाव ते सेलू हे अंतर ८ किमीचे आहे. मोरेगाव ते सेलू हा माझा नेहमीचा व पाहण्यातला रस्ता आहे. आरोपीने दाखविलेले घर हे त्याचेच आहे याची शहनिशा केल्याचे मला माहित नाही. पोलीसांनी आमच्यासमक्ष

*१९.०६.२०२६*
*सत्र न्यायाधीश, परभणी*

त्या घरामध्ये किती लोकं राहतात याबाबत चौकशी केली होती. त्या चौकशीचे उत्तर काय होते हे मला आठवत नाही. आम्ही गेलो त्यावेळी घर उघडे होते. त्या घरामध्ये आम्हाला एक महिला दिसली. सदरहू घर हे अंदाजे तीन खोल्यांचे असेल. चाकू असलेला डब्बा जप्त केला नाही. पंचनामामध्ये डब्याची लांबी व रूंदी नमुद केली नव्हती. मला बतई (स्वयंपाकघरामध्ये वापरण्यात येणारा चाकू) व चाकू याच्यामधील फरक कळतो. चाकू (एमओ–४) हा बतई नाही. सही करण्यापूर्वी मी पंचनामा वाचला होता. पंचनामा (नि.क्र.५७) मध्ये जप्त केलेला चाकू (एमओ–४) हा बदामी रंगाच्या कापडी पिशवीमध्ये ठेवून मोहोरबंद केला व त्यावर आमच्या सह्यांचा कागद चिटकविला याबाबतचा उल्लेख केलेला नाही.

०८) हे म्हणणे खरे नाही की आरोपीने कोणताही निवेदन पंचनामा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने त्याच्या घरून कोणत्याही प्रकारचा चाकू काढून दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की सर्व पंचनामे हे पोलीस स्टेशनमध्ये तयार करून पोलीस स्टेशनमध्येच आम्ही सह्या केल्या. पंचनामामध्ये जप्तीच्यावेळेस छायाचित्रे काढल्याचा उल्लेख केलेला नाही. मला दाखविलेले छायाचित्रांवर तारीख व ते कोणी काढले आहेत याचा उल्लेख नाही.

०९) पोलीस स्टेशनमध्ये असतांना आरोपीने तो कपडे सुध्दा काढून देणार याबाबतचे निवेदन दिले नव्हते. कपडे जप्तीचा पंचनामा हा अंदाजे दुपारी ०४:०० वाजता केला. कपडे जप्ती पंचनामाच्या छायाचित्राच्या वेळेस तारीख व छायाचित्र कोणी काढले आहेत याचा उल्लेख केलेला नाही. कपडे जप्तीच्या पंचनामामध्ये कपडे हे कापडी पिशीमध्ये टाकून मोहोरबंद केले व

आमच्या सह्यांच्या चिट्टया चिटकविल्याबाबतचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की मी नेहमीचाच पंच असल्याने सर्व पंचनामांवर पोलीस स्टेशनमध्ये सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने कोणतेही निवेदन केले नाही व त्यानुसार कोणताही मुद्देमाल काढून दिला नाही.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./-

(आर.एम.सादराणी)

दिनांक – १९.०६.२०२६ सत्र न्यायाधीश, परभणी.